# परतवाडा-धारणी मार्गावर होणाऱ्या अपघाताला जबाबदार कोण?

## वनविभागाचे अडेलतट्टू धोरण अनेकांच्या मृत्यूचे कारण




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** - परतवाडा-धारणी मार्गावर सोमवारी( दि.24) अपघात झाला. त्यात 3 महिला व 1 पुरुषाचा मृत्यू झाला. ह्या मार्गावर पुलांच्या तीव्र वळणामूळे, तसेच रस्त्याच्या तीव्र वळणामूळे शेकडो लोकं जीवानिशी तर हजारो अपंग झालेले आहेत. परतवाडा,-धारणी हा रस्ता बहुतांश लांबित वनविभागातून जातो. वनविभाग वन कायद्यामुळे रस्ता सरळीकरण, रुंदीकरण करण्यास परवानगी देत नाही. ह्या अडचणीमुळे ह्या रस्त्यावरील वळण मार्गाच्या सुधारणा होत नाही. याचा दोष आपण सरकारी यंत्रणेवर टाकून मोकळे होतो. सरकारी यंत्रणा,प्रशासन कामे सुचवतात. मंजूर करणे हे शासनाचे काम आहे. शासन मंजूर करताना, जागा उपलब्ध आहे काय हे प्रथम विचारते, त्यानंतरच काम मंजूर करते. वनविभाग सद्यस्थितीत असलेल्या जागेपेक्षा एक फूटही नवीन जागा देत नाही.म्हणून वळण मार्गाची सुधारणा करण्याचे काम प्रशासन सुचवत नाही आणि त्याचे दुष्परिणाम होऊन कित्येक लोकांना आपल्या प्राणाला मुकावे लागते. वनविभागाचे हे अडेलतट्टू धोरण अनेक लोकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहे.

अमरावती-परतवाडा-धारणी हा रस्ता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग म्हणून सुधारणेसाठी मंजूर केला होता, परंतु 4-5 वर्षे जाऊनही भारत सरकारचा वनविभाग रुंदीकरण, सरळीकरण, नवीन पुल, सुधारणा करण्यासाठी लागणारी जागा उपलब्ध करून देण्यास तयार नसल्याने हा प्रस्ताव रद्द झाला. त्याचवेळी रिलायन्सने मात्र पूर्णपणे जंगलातून जेसीबी ने खोदत नेऊन परतवाडा ते हरिसालपर्यंत पूर्णपणे केबल टाकली. तेव्हा त्यांना कोणी अडविले नाही. रिलायन्स करिता वेगळा न्याय व व सामान्य लोकांसाठी वेगळा न्याय का? केंद्र सरकार मधील वनविभाग ऐकत नाही म्हणून हा जीवघेणा रस्ता दुरुस्त होणारच नाही का? नाही त्या ठिकाणी दंडेलशाही करून आपल्या मनमर्जिनुसार कामे करून घेणारे लोकनेते ह्यावेळी गप्प का बसतात? इतक्या लोकांचे बळी गेल्यानंतरही राजकीय नेते आक्रमक होऊन भूमिका का भांडत नाही? मेळघाटातील आदिवासी बांधवांची मते घेण्यासाठी अनेक पुढारी आदिवासीच्या प्रेमाचा पुळका आणतात; पण त्या आदिवासी बांधवांवर जीव गमावण्याची वेळ येते तेव्हा मात्र हे नाटकी पुढारी कुठे लपून बसतात? स्थानिक पातळीवर कामांचे श्रेय घेणारेही केंद्र शासनाकडून मंजुरी आणण्याचे कठीण काम मात्र सोईनुसार बाजूला टाकतात.दिल्लीच्या रस्त्यावर जेव्हा जनता उतरते तेव्हा, केंद्र शासनाला झुकावे लागते.आपल्याकडील नेते सोपे-सोपे प्रश्न सोडवून आपला उदो उदो करवून घेतात.परंतु लोकांसाठी जीवघेणा ठरत असलेल्या परतवाडा-धारणी रस्त्याला सर्व जनतेला आवाहन करून,केंद्र शासनाला वन विभागाची मंजुरी घेण्यासाठी केव्हा भाग पाडणार ?

सरकारी नियम जनतेच्या भल्यासाठीच आहेत. मग ते किचकट नियम जनकल्याणासाठी थोडे वळवून आणि लवचिक का करून घेतल्या जात नाहीत ? सरकारी नियम आपल्या सोईसाठी आणि स्वार्थासाठी वाकवून आणि वळवून घेणे हे तर आमच्या सर्वपक्षीय नेत्यांच्या अंगवळणी पडलेलं आहे.रस्ते हे विकासाच्या नाड्या आहेत हे वाक्य आम्ही लहानपणापासून ऐकत आलेलो आहोत. रस्ता सरळ आणि चांगला झाल्यास अमरावती वरून धारणीला 2 तासात पोहोचणे सहज शक्य होईल आणि आदिवासी भागाचा कायापालट सुद्धा होईल.

### समुद्राखालून रस्ता बनवायला परवानगी, जंगलाच्या भागातून नाही!



समुद्राच्या खालून रस्ता बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाला परवानग्या मिळतात, पण धारणी रस्त्याकरिता कोणी नेता समोर येऊन पुढाकार का घेत नाही ? सगळे आपापल्या मोहोल्यातच शेर आहेत. या रस्त्यावर इतके बळी जात असतानाही कोणत्याही आमदार खासदाराला आक्रमक आंदोलन का करावेसे वाटत नाही? आता जनतेनेच आपल्या लोकप्रतिनिधींना या दुर्घटनांसाठी कठोरपणे जाब विचारला पाहिजे. तरच हे विनाकारण सुरू असणारे बळीचे सत्र थांबू शकते.

**-अरविंद गावंडे, सेवानिवृत्त अभियंते सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती, तथा जिजाऊ बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक.**

# विदर्भाच्या राजाच्या मिरवणूकीतून चोरट्यांनी 106 ग्रॅम सोने केले लंपास

## 25 मोबाईलही चोरीला





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )**- सोमवारी येथे न्यू आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाव्दारे काढण्यात आलेल्या विदर्भाच्या राजाच्या मिरवणूकीदरम्यान चोरट्यांनी चांगलाच हात साफ केला. दरम्यान 4 व्यक्तींचे सोनसाखळी, 1 चांदीची चेन आणि 3 महिलांचे मंगळसुत्र असा 106 ग्रॅम सोने लंपास केले. तसेच 25 मोबाईलही चोरीला गेल्याच्या तक्रारी कोतवाली पोलिसांना प्राप्त झाल्या आहेत.

### विसर्जन मिरवणुकीतील सात महिला चोरांना अटक

शहरात विदर्भ राजाची विसर्जन मिरवणूकीत गर्दीचा फायदा घेऊन चोरी करणार्या सहा महिलांना गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अटक केली. या महिला बीड जिल्ह्यातून चोरीच्या उद्देशाने आल्या होत्या. पोलिसांनी महिला चोराकडून धारदार ब्लेडही जप्त केले आहे. विसर्जन मिरवणुकीत अनेक चोरटे असतील, असा पोलिस विभागाचा पूर्वीपासून अंदाज होता. त्यामुळे पोलिसांची विविध पथके सर्व हालचालींवर लक्ष ठेवून होती. गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाला रेल्वे स्थानकाजवळ काही महिला संशयास्पदरित्या उभ्या असल्याचे दिसले. या महिलांची पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी केली. पोलिसांना पाहताच सर्व महिला घाबरल्या, पोलिसांना संशय आल्याने या महिलांना कोतवाली पोलिस ठाण्यात आणण्यात आले.

त्यांच्या पोलिस रेकॉर्डची तपासणी केली असता, या महिला बीड जिल्ह्यात राहणाऱ्या आणि चोरीच्या गुन्ह्यात सक्रिय असल्याचे समोर आले. कोतवाली पोलिसांनी सहाही महिलांना नजरकैदेत ठेवले. वरील कारवाई गुन्हे शाखा एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या महिलांना मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता, त्यांना 26 सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# ट्रक चालकाची गळफास घेऊन आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.24 )**- वरूड ते तिवसाघाट महामार्गावरील शर्मा यांच्या पेट्रोल पंपावर 18 चाकी ट्रक क्रमांक आर जे 42 जी ए 0718 गेल्या दोन दिवसांपासून विनामाल अवस्थेत उभा होता. या ट्रकचा चालक पप्पू उर्फ सलाम उद्दीन इस्माईल खान (46) रा.बडोशिया जि.नागोरा (राजस्थान) याने त्या ट्रकवरील वाहक याला माझी प्रकृती बरी नसल्याचे सांगितले. त्यानंतर तो दोन दिवसांपासून दारू पित होता. मंगळवार 24 सप्टेंबर रोजी सकाळी 7 वाजताच्या सुमारास पेट्रोल पंपावर उभ्या असलेल्या ट्रकच्या वरच्या बाजूला त्याने दोरी बांधून त्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिसून आले. या घटनेमूळे पेट्रोल पंप परिसरात सर्वत्र एकच खळबळ उडाली. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यानागरिकांनी काही वेळ घटनास्थळी गर्दी केली होती. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत मृतकाचा पंचनामा केला व त्याचा मृतदेह खाली उतरवुन उत्तरणीय तपासणी करिता ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी ट्रक मालकाला माहिती दिली असता पांढुर्णा येथे उपस्थित असलेल्या ट्रकमालकाने वरूड गाठले व या घटनेची माहिती पप्पु उर्फ सलाम उद्दीन यांच्या कुटुंबीयांना देण्यात आली.


# तलवारीचा धाक दाखवून लुटणाऱ्या तिघांना अटक

**अमरावती** - तलवारीचा धाक दाखवूनव 15 हजार रुपयांचा ऐवज लुटल्याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने मंगळवारी ही कारवाई केली. सुरज दिवाकर सावते (20, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, शेगाव, अमरावती), राज लोमेश काळे (21, रा. केवल कॉलनी) आणि प्रक्षिक उर्फ शूटर प्रतिन वासनिक (21, रा. रहाटगाव आम) यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. नीलेश माधवसा आपरे (42, रा. छाया कॉलनी, अकोली मार्ग) हे मिठाईच्या व्यवसायात काम करतात. ते काम आटोपून दुचाकीने एका व्यक्तीसोबत घरी जात होते. यावेळी तीन जणांनी अचानक गाडगेनगर परिसरात नीलेशची दुचाकी अडवली व त्यांच्या मानेवर तलवार ठेवून त्यांच्या खिशातील 15 हजार रुपये घेऊन पळ काढला होता.

# कत्तलीसाठी 10 गोवंशाची वाहतूक करणारे वाहन पलटी

## दोन गायींचा घटनास्थळीच मृत्यू ■ वाहनचालकासह अन्य फरार





**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.24 )** - बोलेरो टाटा मालवाहू गाडीत 10 गोवंशजातीचे जनावरे अतिशय निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी नेत असतांना भरधाव वेगाने जाणारी टाटा पिकअप मोर्शी ते वरुड रोडवर असलेल्या दापोरी गावच्या फाट्याजवळ पलटी होऊन झालेल्या अपघातात दोन गायी घटनास्थळीच मृत्युमुखी पडल्या. घटनेची माहिती मोर्शी पोलिसांना प्राप्त होताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र, आरोपींनी घटनास्थळी गाडी व जनावरे सोडून पलायन केले. मोर्शी पोलिसांनी वाहनासह एकूण 5 लाख 37 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून फरार आरोपीचा शोध घेणे सुरू केले आहे. ही घटना 23 सप्टेंबर रोजी रात्री 11:30 सुमारास दरम्यान घडली.

मध्यप्रदेश येथून वरुड मार्गे बोलेरो टाटा वाहन गाडी क्र.एम एच 27 बी एक्स 6048 मध्ये 10 गायी अतिशय निर्दयतेने व अमानुषरित्या कोंबून वाहन भरधाव वेगाने कत्तलीसाठी जात असतांना पलटी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. टाटा पिकअप वाहनाच्या बाजूला अत्यवस्थ व जखमी अवस्थेत पडून असलेल्या गायी 8 जनावरांची पशुधन विकास अधिकारी यांच्या हस्ते वैयक्तिक तपासणी करण्यात आली. त्यानंतर गायींना येरला येथील गौरक्षणमध्ये दाखल करून त्यांची चार्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

यावेळी वारसा संस्थेचे अध्यक्ष अभिलाष व्यवहारे व त्यांच्या टीमने मोलाचे सहकार्य केले. गाय जातीचे जनावरे अवैधरित्या कोंबुन आखुड दोराने बांधुन कत्तलीसाठी नेत असतांना अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येऊन टाटा पिकअप गाडी ताब्यात घेण्यात आली.

# ग्राम पंचायत कार्यालय विर्शी

## पंचायत समिति भातकुली, जिल्हा परिषद अमरावती

### निविदा सुचना २३-२४

ग्रामपंचायत विर्शी पंचायत समिति भातकुली ता.जि. अमरावती यांचेकडून अ.जा. नवबौद्ध घटकाचे वस्तीचा विकास करणे सन २०२३/२४ अंतर्गत खालील कामाकरीता निविदा बी-१ शेकडेवारी दराने मागविण्यात येत आहे. तरी जिल्हा परिषदेकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांनी बी-१ निविदा द्विलीफाफा पद्धतीने दिनांक २५/०९/२०२४ ते ०१/१०/२०२४ ला ३.०० वाजेपर्यंत सीलबंद पाकिटात निविदा/दरपत्रके सरपंच ग्रामपंचायत विर्शी यांचे नावे ग्रामपंचायत कार्यालय, विर्शी पंचायत समिति भातकुली ता.जि. अमरावती येथे सादर करण्यात यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्षक | अंदाजित किमंत रूपये | बयाना रक्कम १% | कामाची मुदत | निविदा प्रसिद्धीची वेळ | पंजीकृत कंत्राटदारांचे वर्गीकरण | निविदा फी | कोऱ्या निविदा मिळण्या साठी दिनांक व वेळ | निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ | निविदा उघडण्याची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र शेंडे घर ते लेंडी नाला पर्यंत कॉंक्रिट नाली | अ.जा. नवबौद्ध घटकाचे वस्तीचा विकास करणे. | ५.०० लक्ष रूपये | ५०००/- | ६ महिणे | १०.०० वाजता | वर्ग-७ व त्यावरील | ५०० | २५/०९/२०२४ ते ०१/१०/२०२४ कार्यालयीन वेळ | २५/०९/२०२४ ते ०१/१०/२०२४ कार्यालयीन वेळ | ०३/१०/२०२४ सकाळी १०.०० वाजता |

**अटी व शर्ती :**

१) निविदा ह्या दोन लिफाफा पद्धतीने स्विकारल्या जातील.

२) अटी व शर्ती ग्रामपंचायत विर्शी येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

३) निविदा स्विकारणे किंवा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायत सरपंच यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत विर्शी,**
**पं.स. भातकुली जि. अमरावती**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# उर्समध्ये पुरामुळे लाखोंचे नुकसान

## व्यापाऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी





**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.24 )-** शहरातील प्रसिद्ध दरगाह हजरत अब्दुल रहमान गाजी रहमतुल्ला अलैह यांच्या उर्सच्या दरम्यान अचानक आलेल्या पुरामुळे स्थानिक व्यापार्यांदचे मोठे नुकसान झाले आहे. 24 सप्टेंबर रोजी दुपारी साधारणपणे 3 वाजता बिच्छन नदीत आलेल्या पुरामुळे दरगाहच्या परिसरातील दुकानांमध्ये पाणी शिरले, ज्यामुळे व्यापार्यांतना लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागले.

दरवर्षी उर्सच्या निमित्ताने दरगाह परिसरात विविध प्रकारच्या दुकानांची मांडणी केली जाते, ज्यात मेवा, मिठाई, चहा, खाद्यपदार्थांची हॉटेल्स, खेळणी, मनोरंजनासाठी झुला, कपड्यांच्या दुकानांचा समावेश असतो. परंतु यावर्षी अचानक आलेल्या पुरामुळे व्यापारी, जे मुख्यत= बाहेरील गावांतून येतात, त्यांचा माल वाहून गेला असल्याचे सांगण्यात येत आहे.

### सुदैवाने जीवितहानी टळली

या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, जर प्रशासनाकडून वेळेवर सूचना दिली गेली असती तर व्यापार्यांनि एवढ्या मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले नसते. अचानक आलेल्या पुरामुळे व्यापारी आर्थिक संकटात सापडले आहेत. या घटनेने प्रशासनाची हलगर्जीपणाही समोर आणली आहे. व्यापार्यीचे म्हणणे आहे की, जर वेळेवर पुराची सूचना दिली गेली असती, तर त्यांचे नुकसान टाळता आले असते. आता सर्वांचे लक्ष प्रशासनाच्या निर्णयाकडे लागले आहे, आणि लवकरात लवकर नुकसानभरपाईची घोषणा होईल, अशी अपेक्षा आहे.

### प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान

पुराची माहिती प्रशासनाकडून वेळेवर न मिळाल्याने व्यापार्यांआना त्यांचा माल वाचविण्याची संधी देखील मिळाली नाही. दुपारी 3 वाजता व्यापाऱ्यांनी दुकान उघडण्याची तयारी सुरू केली होती, परंतु अचानक आलेल्या पुरामुळे त्यांचा माल वाहून गेला. दुकानांमध्ये ठेवलेला माल पूर्णतः खराब झाला, ज्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले. काही दुकानांमध्ये खाद्यपदार्थ आणि कपड्यांचा मोठा साठा होता, ज्यामुळे या व्यापाऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागतोय.

# पेट्रोल पंपाजवळ पडलेल्या खड्ड्याने अपघाताची शक्यता

## जबाबदारी कुणाची ? आयआरबी की पेट्रोलपंप मालकाची



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव पेठ, ( दि.24 )-** राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या कोल्हटकर पेट्रोलपंप जवळ पावसामुळे खड्डे पडल्याने अपघातांची शक्यता बळावली आहे. दुचाकी चालकांना पाणी साचलेल्या खड्डयांमुळे प्रचंड मानसिक त्रास होत आहे. बऱ्याच दिवसांपासून याठिकाणी खड्डे पडलेले असून अद्यापही याठिकाणी डागडुजी किंवा दुरुस्ती करण्यात आलेली नाही, त्यामुळे दुरुस्ती करण्याची जबाबदारी नेमकी आयआरबी की पेट्रोलपंप मालकाची याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे.

राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे वाढलेले प्रमाण बघता वाहनचालकांच्या दृष्टीने सुरक्षा असणे अत्यंत महत्वाची बाब आहे.या मार्गावर असलेल्या अनेक पेट्रोलपंपाजवळ जड वाहनांमुळे खड्डे पडलेले आहेत.मात्र बऱ्याच ठिकाणी खड्डयांची डागडुजी न झाल्याने पेट्रोल भरण्यासाठी जाणाऱ्या वाहनचालकांना नाहक मानसिक त्रास सोसावा लागतो. नागपूरकडे जाणाऱ्या अधिकाधिक वाहनांचा कल कोल्हटकर पेट्रोलपंपावर जास्त असल्याने याठिकाणी वाहनांमुळे मोठमोठेखड्डे पडलेले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचलेले आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची प्रकाश व्यवस्था नसल्याने दुचाकी वाहनांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याठिकाणी दोन वेळा अपघात देखील झाले आहेत त्यामुळे पेट्रोलपंप जवळ रस्ता सुरळीत असणे अत्यावश्यक आहे. महामार्गावरील सुरक्षा ही आयआरबीकडे असल्याने त्यांनीही या प्रकाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे मात्र आयआरबी आणि पेट्रोलपंप मालक यांच्यात समन्वय नसल्याने सुविधांकडे दुर्लक्ष होत असून याचा परिणाम मात्र सर्वसामान्य वाहनचालकांना भोगावा लागत आहे. पेट्रोलपंप नजीकच्या खड्डे तातडीने बुजविण्यात यावे तसेच प्रकाश व्यवस्था सुरळीत करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# अमरावती आयटीआयचे संत गाडगेबाबाच्या नावाने नामकरण

## आ.सुलभा खोडकेंनी मानले उपमुख्यमंत्री पवार, मंत्री लोढांचे आभार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )-** पुरोगामी महाराष्ट्राला मानवतेचा संदेश देणारे कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या अमरावती जिल्ह्यातील आजच्या नवीन पिढीला त्यांचे जीवनकार्य व विचार ज्ञात व्हावे व विद्यार्थी दशेतच संत गाडगे महाराज यांचे मानवतावादी विचार नवीन पिढीमध्ये रुजविण्यासाठी त्यांना त्यांच्या विचारांचा वसा जोपासत विकास व परिवर्तनाची दिशा मिळावी, हा उदात्त दृष्टिकोन बाळगून अमरावतीच्या आमदार- सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,अमरावतीला संत गाडगेबाबा यांचे नाव देण्याची मागणी राज्य शासनाकडे केली होती.

याची फलश्रुती म्हणून राज्य शासनाचे वतीने राज्यातील 14 आयटीआय संस्थांना समाजसुधारक आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वांची नावे देण्याचा निर्णय सोमवार दिनांक 23 सप्टेंबर 2024 रोजी मुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्याअध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यात अमरावती स्थित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण करण्यात आले आहे. याबद्दल आमदार सुलभा खोडके यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमं देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व कौशल्य विकास मंत्री-नामदार मंगलप्रभात लोढा यांचे आभार मानत अभिनंदन केले आहे.

# वृध्दाला ट्रकने चिरडले

## अंजनगाव, दर्यापूर टी पॉईंट वरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.24 )-** दर्यापूर, अंजनगाव टी पॉईंट वर सकाळी 9 वाजता अकोल्याहून येणारा अंजनगावकडे जाणारा ट्रक क्रमांक आरजे 11/ जीबी 2750 ट्रकच्या मागील चाकामध्ये वृध्द इसमाचा तोल जावून चाकाखाली आला. यात त्या वृध्दाचा जागीच मृत्यू झाला. रमेश शामराव वानखडे (वय 60 वर्ष, रा. सिद्धार्थ नगर,बाभळी) असे त्या मृतकाचे नाव आहे. रस्ता उलटताना तोल गेल्याने ट्रकच्या मागील चाकाखाली तोंड आल्याने ते जागीच ठार झाले. हे समजतात ट्रक चालक व त्याचा सहकारी हे दोघेही ट्रक सोडून पळून गेले.याप्रकरणी दर्यापूर पोलिसांनी पुढील कारवाई केली.



# कार्यालयीन वेळेत गैरहजर कर्मचाऱ्यांवर कारवाई करा!

## अन्यथा रिकाम्या खुर्च्यांना चपलांचा हार घालण्याचा इशारा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.24 ) -** येथील तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत दांडी मारत असल्याने सामान्य नागरिकांचे हाल होत आहे. अशा कामचुकार कर्मचाऱ्यांना तंबी देऊन कार्यालयीन वेळेत हजर राहण्याचे आदेश द्यावे अन्यथा रिकाम्या खुर्च्यांना चपलाचे हार घालून आंदोलन करण्याचा इशारा येथील राष्ट्रवादी युवक काँग्रेसने(श.प.गट) दिला.

तहसिल कार्यालयात सतत तालूक्यातील नागरिक विविध कामासाठी येत असतात. ज्यात शेतकरी, विद्यार्थी, सामान्य नागरिकांना कर्मचारी खुर्चीवर दिसत नसल्याने आल्यापावली परत जावे लागते. कर्मचारी जागेवर नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. तहसिल कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी कामावर न येण्याचे प्रमाण गेल्या काही दिवसांपासून वाढले आहे. त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. अशा अनेक तक्रारी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सागर हुरबडे यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. विविध कामासाठी तहसील कार्यालयात तालुक्यातील ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांना अधिकारी, कर्मचारी वेळेवर भेटतच नाहीत. दुपारी 2 नंतर काही कर्मचारी आपल्या लंच टाईमच्या नावावर कर्तव्यावर हजर न राहता कार्यालयाच्या बाहेर येऊन गप्पा गोष्टी करत बसतात, त्यामुळे संबंधीत लाभार्थ्यांना त्यांची वाट पाहत बसावे लागत आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना तंबी देऊन कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालूका अध्यक्ष सागर हुरबडे यांच्या नेतृत्वात कल्याण गायगोले, अनिकेत खाडे, शुभम बहिरे, गौरव अलोकर, रुपेश निचळ, पुरुषोत्तम ढोले, अनिल मंगळे, शुभम गायगोले, शुभम ठाकरे, संतोष पोटे यांनी दिले.

### विद्युतनगर योग ग्रुपची संत गाडगेबाबा वृद्धाश्रमाला भेट

**अमरावती -** विद्युतनगर परिसरातील योग ग्रुपच्या सदस्यांनी संत गाडगेबाबा वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी भगिनींना काही निधी एकत्र करीत वृद्धाश्रमातील वृद्धांना रोजच्या वापरातील वस्तूंची अर्थात रोजच्या वापरातील तेल, साबण, पेस्ट, बिस्किट आदींचे वाटप केले. यावेळी जेसीआय राष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. चारुदत चौधरी यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कमल गवई यांच्या अध्यक्षतेखाली माजी नगरसेविका प्रभा आवारे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. या भेटीकरिता आशा निचत, माया बोंडे, अंजली कुलकर्णी, सविता तलवार, शीला वानखडे, प्रमिला टाके, शोभा देवांग, विद्या धाकडे गावंडे, राणी इंगोले, नीलिमा भोईर, सविता वाटाणे, कल्पना तायवाडे, नीता लाडवळे, सविता कावरे, पिंगळे, सुनीता आवारे, सुमती खगोडे, वंदना वानखडे, संगीता लाडो निर्मला वानखडे आदींनी परिश्रम घेतले.

# आज अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना कुलूप

## शेकडो शिक्षक धडकणार जिल्हाधिकारी कार्यालयावर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.24 )-** चुकीच्या धोरणामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊन ग्रामीण भागातील ज्ञानमंदिरे ओस पडू लागली आहेत. आता मात्र शिक्षकांनीच त्रिस्तरीय आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे. यासाठी 25 सप्टेंबर रोजी अमरावती जिल्ह्यातील हजारो शिक्षक सामुदायिक रजा घेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देणार आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा बंद राहणार आहे.

सरकारने शिक्षक संच मान्यता व कंत्राटी शिक्षक भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे ज्या जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या 20 असेल अशा शाळांमध्ये एक कायम तर एक कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. मात्र या धोरणाने ग्रामीण शिक्षणाचा दर्जा वाढण्याऐवजी त्याचा अधिकच बट्ट्याबोळ उडणार आहे.असा आरोप शिक्षक संघटनांसह पालकांनी केला आहे. दुर्गम भागात विद्यार्थ्यांची संख्या आजही अधिक आहे, परंतु त्यांच्याकडे आधार नोंदणी नसल्याने याचा फटका शिक्षकांची पदे भरताना बसणार असून या निर्णयालाच शिक्षक संघटनेने विरोध केला आहे. याकरिता संपूर्ण राज्यात त्रिस्तरीय आंदोलन केले जाणार आहे. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात सर्वच शाळांमधील शिक्षक काळ्या फिती लावून काम करत आहेत. आता 25 सप्टेंबर रोजी तिसऱ्या टप्प्यात शाळांना टाळे ठोकून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत आंदोलन करणार आहेत.

### आरोग्य तपासणी शिबिर

**अमरावती -** रेड स्वस्तिक सोसायटीच्या वतीने विदर्भ प्रीमियर हाउसिंग सोसायटी, किरणनगर येथे रक्त गट, रक्त शर्करा व रक्त दाब तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिराचे आयोजन विजय कुलकर्णी व हाउसिंग सोसायटीचे पदाधिकारी यांनी केले.

# विजेच्या लपंडावामूळे अंजनगाव बारीवासी त्रस्त

### अंजनगाव बारी फिडर रामभरोसे

### महावितरणच्या मनमानी कारभारवर आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.24 )-**काही दिवसांपासून सततच्या विजेच्या लंपडव्यामुळे घरगुती विज पुरवठा यंत्रणा पुर्णतः निष्क्रिय झाली, असुन विभागाच्या मनमानी कारभारामुळे ग्राहकांची कोंडी झाली आहे. अनेक दिवसांपासून मनमानी पद्धतीने विजपुरवठा वारंवार खंडित केला जात असुन वातावरणातील आर्द्रता व बदलते हवामानामुळे नागरिक विद्युतपुरवठया अभावी हैराण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली असता कर्मचाऱ्यांची कामात अनियमीत, कर्मचारी बदल्या व इतर कारणांमुळे ग्राहक व नागरिकांना उडवाउडवीची उत्तरे देऊन अधिकारी मोकळे होऊन जाताना च्या घटना समोर येत आहे.

महावितरणने अंजनगाव बारी विद्युत पॉवर हाऊस पुर्णतः वाऱ्यावर सोडले असुन सदर ठिकाणी मागील 15 दिवसापासून ज्युनिअर इंजिनिअरची अनुपस्थिती आहे. दुसरे इंजिनियर येण्याअगोदर जुन्या पोस्टिंग अधिकाऱ्याला कसे काय सोडण्यात आले, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जात असल्याची तक्रार भाजपा किसान मोर्चा जिल्हा सरचिटणीस राजू वडनेरकर यांनी केली आहे. त्याचप्रमाणे रात्री-बेरात्री अचानक विद्युत पुरवठा खंडित झाल्यास नागरिकांनी अंधारात रात्र काढावी लागत आहे, तसेच विजेच्या सततच्या लपंडावामुळे बँके, खाजगी तसेच ऑनलाईन कामात व व्यवहारात खंड पडत असल्याने वृद्ध, आजारी व लहान बालकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन नागरिकांच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

### गौरी, गणपतीच्या सणातही अंधार

याआधीही गौरी- गणपतीच्या सणात अंजनगाव बारी पॉवर स्टेशन मधील सर्व गावे अंधारात होती. वीज वितरण कंपनीचे अधिकारी, कर्मचारी झोपेत असतानाचे समजते दि.10 सप्टेंबर 2024 रोजी रात्री एक वाजता विद्युत सप्लाय गावठाण मधील पूर्णतः बंद झाले. सर्व अधिकारी कर्मचारी-अधिकाऱ्यांना फोन केले परंतू अधिकारी गाढ झोपेत होते, अखेर कार्यकारी अभियंता यांनी फोन उचलून त्यांच्या इतर कर्मचाऱ्यांना जागे केले असल्याची माहिती आहे.

# मुख्यमंत्र्यांना धनगर समाजाचे निवेदन

## मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.24 )-** पंढरपूर येथे धनगर बांधवांचे दि.09 सप्टेंबर 2024 पासून धनगर जमातीचे आरक्षण अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी आमरण उपोषण करीत आहेत, उपोषणकर्त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे, त्यांच्या जीवाला काही बरे वाईट झाल्यास त्याला महाराष्ट्र शासन व प्रशासन जबाबदार राहील. चांदूर बाजार येथे निवासी नायब तहसीलदार यांना निवेदन देत आगामी निवडणूकीमध्ये मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

धनगर जमात महाराष्ट्रात पिठ्यानपिढ्या मेंढपाळ आणि पशुपालक म्हणून कार्यरत आहे. 1956 साली अनुसूचित जमातीच्या (स्ट्/स्ज्ञ) यादीत महाराष्ट्रातील अनु. जमातीच्या यादीत अनु.क्र.36 वर धनगड जमात दाखल करण्यात आली. ज्यामुळे धनगर जमात गेल्या 68 वर्षांपासून त्यांच्या सवैधानिक हक्का पासून वंचित राहिला आहे. %धनगड% नावाची जमात महाराष्ट्रात कुठेच अस्तित्वात नाही. महाराष्ट्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयात तीन वेळा स्पष्ट केले आहे की, धनगड जमात अस्तित्वात नाही. मात्र %धनगर% जमात अस्तित्वात आहे. त्यामुळे धनगर जमातीता अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याकरिता शासनाने त्वरित शासन निर्णय काढणे आवश्यक आहे. धनगड नावाची जमात 1956 मध्ये आणि त्याआधीही महाराष्ट्रात अस्तित्वात नव्हती, परंतु %धनगर जमात अस्तित्वात होती आणि आहे. त्यामुळे त्या जागी धनगर जमातीला अनुसूचित जमात म्हणून मान्यता देणे संविधानाच्या कलम 342 (1) नुसार आवश्यक आहे. 15 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या बैठकीत आपण समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शासन निर्णय काढण्याचे आश्वासन दिले होते.

परंतु आता पर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामूळे निवडणूकीपुर्वी धनगर आरक्षणावर ठोस निर्णय न झाल्यास मतदारनावर बहिष्कार करण्याचा इशारा चांदूर बाजार निवासी नायब तहसीलदार यांच्याव्दारे मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून दिला.